**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८**
**ब प्रभाग समिति, चिंचवड**
**सभावृत्तांत**
**कार्यपत्रिका क्र. ८**

**दिनांक :- ११ /११/२००९** **वेळ :- दु. १२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. ११/११/२००९ रोजी दु. १२.१५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत बैठकीस खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. तिकोने हरिभाऊ किसन | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. चौधरी अख्तरहुसेन तालुकादार | सदस्य |
| ३. | मा. श्री. भोंडवे तुकाराम महादू | सदस्य |
| ४. | मा. श्री. भोंडवे गणेश तुकाराम | सदस्य |
| ५. | मा. श्री. साळुंके राजेंद्र गुलाबराव | सदस्य |
| ६. | मा. श्री. वाघ रघुनाथ दलपत | सदस्य |
| ७. | मा. श्रीम. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्या |
| ८. | मा. श्रीम. गावडे जयश्री वसंत | सदस्या |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.
मा. प्रभाग अधिकारी - श्री. डी. के. गावडे, मा. प्रशासन अधिकारी - श्री. आर.एम. कोंढाळकर, मा. कार्यकारी अभियंता - श्री. दिपक ठुबे, श्री. रामदास जाधव, उपअभियंता - श्रीम.एल.एस. बाबर, श्री. पी.ए्. घोडे, श्री. दिलीप भोईटे, श्री. पी.आर. काळुस्कर, श्री. मनोज सेठिया, श्री. एस.एन. वाघुंडे, श्री. आर.एस. पवार, श्री. एम.डी. पाटोदकर कनिष्ठ अभियंता - श्री. शैलेंद्र चव्हाण , उपलेखापाल - श्री. आर.एम. काळे

सर्वप्रथम मा.अध्यक्ष, तिकोने हरिभाऊ किसन यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली. विषयपत्रिकेवर एकूण दोन असल्याने खालील विषय ऐन वेळचे विषय म्हणून सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्र.:- ३** **विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव**

वॉर्ड क्र. ६७ मधील गावडे पार्क मधील नवीन केलेल्या उद्यानाला व त्यामधील हॉल ला अनुक्रमे **जिजाबाई गावडे उद्यान व जिजाबाई गावडे सांस्कृतिक हॉल** असे नांव देण्यात यावे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. :- १४३ | विषय क्र. :- १ |
| दिनांक :- ११/११/२००९ | विभाग :- नगररचना व विकास विभाग |
| सुचक :- मा. गणेश भोंडवे | अनुमोदक :- मा. रघुनाथ वाघ |

विषय :- मौजे रावेत येथील स.नं. १८६ ते १८१ एमआयडीसी रस्ता ते मंजुर विकास योजनेतील स.नं. १३९ मधील नियोजित १८.०० मी. रुंद रस्ता पर्यंत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत १८.०० मी. रुंद म्युनसिपल रोड घोषित करणेबाबत

संदर्भ :- १. मा. ब प्रभाग समिती सभा ठराव क्र. २३० दि. २७/८/०८
२. मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/रावेत/३२०/०९ दि. २७/१०/०९

मौजे रावेत येथील स.नं. १८६ ते १८१ एमआयडीसी रस्ता ते मंजुर विकास योजनेतील स.नं. १३९ मधील नियोजित १८.०० मी. रुंद रस्ता पर्यंत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत १८.०० मी. रुंद म्युनसिपल रोड घोषित करण्याच्या प्रस्तावास मा. ब प्रभाग समितीने ठराव क्र. २३० दि. २७/८/०८ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्या अनुषंगाने नागरिकांच्या हरकती / सुचना मागविणेकामी स्थानिक वर्तमानपत्रात [ दै. भारत डायरी, दि. २/३/२००९, दै. पवनेचा प्रवाह दि. ३/३/०९, दै. संध्यानंद दि.२/३/०९, दै. पुण्यनगरी दि. २८/२/०९ व सा. गगन झेप दि. ४/३/०९ ] जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती. विहित मुदतीत एक ही हरकत / सुचना प्राप्त झालेली नाही.

मौजे रावेत येथील स.नं. १८६ ते १८१ एमआयडीसी रस्ता ते नवीन हद्दवाढ मंजुर विकास योजनेतील स.नं. १३९ मधील नियोजित १८.०० मी. रुंद रस्ता पर्यत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत १८.०० मी. रुंद म्युनसिपल रोड अंतिमरित्या घोषित करणेसाठी मा. महापालिका सभेपुढे मान्यतेकामी शिफारस करणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्र. :- १४४ विषय क्र. २

दिनांक :- ११/११/०९ विभाग :- झोपडपट्टी सुधार,गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती

सुचक :- मा. अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :- मा. जयश्री गावडे

विषय :- वॉर्ड क्र. ६८ मधील एफआरपी वाचनालयास नावे देणेबाबत

संदर्भ :-१. मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती यांचेकडील मंजुर ठराव क्र. १५ दि. ६/८/२००९

२. क्र. नस/९/कावि/६६०/०९ दि. १३/८/२००९

मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती यांचेकडील मंजुर ठराव क्र. १५ दि. ६/८/२००९ अन्वये वॉर्ड क्र. ६८ मधील एफ.आर.पी. वाचनालयांवर खालील प्रमाणे नावे देणेकामी शिफारस करणेत आली असल्याने प्रस्तुतची नावे देणेस मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | वाचनालयाचे ठिकाण | द्यावयाचे नांव |
|---|---|---|
| १ | गिरजुबाबा चौक | बुध्दवासी विनोद जगन्नाथ सोनकांबळे यांचे स्मरणार्थ |
| २ | बौध्दनगर | बुध्दवासी सुभाष वाघमारे यांचे स्मरणार्थ |
| ३ | भाटनगर | कै. चंदा मुरचंद भाट यांचे स्मरणार्थ |
| ४ | लिंकरोड पत्राशेड | बुध्दवासी कमल सुनिल जानराव यांचे स्मरणार्थ |
| ५ | अशोकनगर / पत्राशेड | कै. पप्पु परदेशी यांचे स्मरणार्थ |
| ६ | रमाबाईनगर | मरिअप्पा यमाप्पा कांबळे स्मरणार्थ |

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्र. :- १४५ विषय क्र. :- ३

दिनांक :- ११/११/२००९ विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक :- मा. जयश्री गावडे अनुमोदक :- मा. राजेंद्र साळुंके

विषय :- उद्यान व सांस्कृतिक हॉल ला नाव देणेबाबत

संदर्भ :- मा. सदस्या जयश्री गावडे यांचेकडील पत्र दि. ११/११/२००९

वॉर्ड क्र. ६७ मधील गावडे पार्क मधील नवीन केलेल्या उद्यानाला व त्यामधील हॉल ला अनुक्रमे **जिजाबाई गावडे उद्यान व जिजाबाई गावडे सांस्कृतिक हॉल** असे नांव देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. अध्यक्ष हरिभाऊ किसन तिकोने यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर केले.

**सही/-**
**तिकोने हरिभाऊ किसन**
**अध्यक्ष**
**ब प्रभाग समिती, चिंचवड**

प्रति,
सर्व संबंधित

**सही/-**
**प्रशासन अधिकारी**
**सभाशाखा, ब प्रभाग समिती**
**पिं.चिं. मनपा, चिंचवड-३३**

क्र. एएमसी/बप्र२/कावि/७२५/०९ दि. २६ / ११ /२००९

F:\b ward meet ०९-१०\proced novem.०९.doc